# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक:23.05.2024** **वार :गुरुवार**

---

**बुद्ध पौर्णिमा**

भगवान गौतम बुद्धांचे पंचशील तत्व आणि संत ज्ञानेश्वर माऊलींचं पसायदान हेच जगाला शांतीचा मार्ग दाखवू शकेल. त्याच्या ज्ञानाच्या दिव्य प्रकाशात संपूर्ण जग शांतीचा शोध घेतेय असे उद्गार ज्येष्ठ लेखक आचार्य रतनलाल सोनग्रा यांनी काढले. एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या वतीनं तथागत भगवान गौतम बुद्ध पौर्णिमा साजरी करण्यात आली. त्यावेळी सोनग्रा बोलत होते. पुण्यात हडपसर, कोंढवा परिसरातही आज विविध उपक्रमांनी बुद्ध पौर्णिमा साजरी करण्यात आली.

**एनडीए**

राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमधल्या प्रशिक्षणामुळे प्राप्त झालेल्या नेतृत्व गुणांचा वापर देशसेवेसाठी करून प्रगतीमध्ये योगदान द्याल असा विश्वास हिमाचल प्रदेश विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर सतप्रकाश बन्सल यांनी आज व्यक्त केला. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीच्या 146 व्या तुकडीचा दीक्षांत समारंभ पार पडला त्यावेळी बन्सल बोलत होते. विविध शाखांमधल्या 340 छात्रांना पदवी प्रदान करण्यात आली. 17 मित्र देशांच्या छात्रांचा समावेश होता.

**आरोग्य सेवक भरती**

पुणे जिल्हा परिषदेअंतर्गत आरोग्य सेवक आणि ग्रामसेवक पदांच्या प्रलंबित परीक्षा जून महिन्यात होणार असल्याची माहिती स्पर्धा परीक्षा समन्वय समिती पुण्याचे कार्याध्यक्ष महेश घरबुडे यांनी दिली आहे. हंगामी आणि कायमस्वरुपी पुरूष आरोग्यसेवक पदासाठी 10 ते 15 जून दरम्यान तर आरोग्यसेविका पदासाठी 16 जूनला परीक्षा होतील. ग्रामसेवक पदासाठी 16 ते 21 जून दरम्यान परीक्षा होणार आहेत.

**पुणे कचरा**

पुणे महापालिकेच्या घनकचरा विभागानं कचरा जाळणे, वर्गीकरण न करणे यासाठी सुधारित दंडाची तरतूद केली आहे. महापालिकेच्या घनकचरा विभागाचे प्रमुख आणि उपायुक्त संदीप कदम यांनी याबाबत नुकतेच आदेश जारी केले आहेत. यामध्ये दंडामध्ये पाच पट वाढ करण्यात आली आहे. पहिल्या वेळी तीनशे रुपये आणि त्यानंतर प्रत्येक वेळी पाचशे रुपये दंड आकारला जाईल. बल्क वेस्ट जनरेटर्ससाठी पहिल्या वेळी पाच हजार रुपये तर पुढील प्रत्येक वेळी पंधरा हजार रुपये असेल, असंही आदेशात स्पष्ट केलं आहे.

**पुणे म्हाडा**

म्हाडाच्या पुणे विभागानं चार हजार 877 घरांसाठी सोडत जाहीर केली आहे. या घरांसाठी अर्ज करण्यासाठी शेवटचे सात दिवस असून 30 मे रोजी रात्री बारा वाजेपर्यंत अर्ज करता येऊ शकतात. त्यासाठी संकेतस्थळावर नोंदणी करण्याचं आवाहन पुणे विभागाकडून करण्यात आलं आहे.

**निवासी मिळकत**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत तीस जूनपर्यंत मिळकत कराचा भरणा करणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती जाहीर केल्या आहेत. 2024-25 या आर्थिक वर्षात दीड महिन्यात 25 टक्के मालमत्ताधारकांनी दोनशे कोटी रुपयांचा कर

पालिकेच्या तिजोरीत जमा केला आहे. त्यामुळे नागरिकांनी 30 जूनपर्यंत विविध मालमत्ता कर सवलतीच्या  लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

**<u>पब/बार कारवाई</u>**

पुणे पालिका प्रशासनानं कोरेगाव पार्क, मुंढवा, कल्याणीनगर, विमाननगर, पुणे स्टेशन, घोरपडी परिसरातल्या अनधिकृत हॉटेल, पब, बार वर कारवाई केली आहे. यामध्ये 54 हजार 300 चौरसफूट बांधकामं आणि पत्र्याच्या शेड हटवण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<u>चांदणी चौक</u>**

कल्याणीनगर अपघाताच्या पार्श्वभुमीवर, चांदणी चौक परिसरातल्या हॉटेल्स, पब मध्ये तरुणाईची वाढती संख्या, तसंच उड्डाणपुलाच्या लावण्यात येणाऱ्या दुचाकींची गर्दी, लक्षात घेता, कोणतीही दुर्घटना घडण्यापुर्वी पोलिसांनी काळजी घेत गरजेनुसार कारवाई करावी असं आवाहन चांदणी चौकातल्या स्थानिक रहिवाशांकडून करण्यात आलं आहे.

**<u>पिंपरी चिंचवड फलक</u>**

अनधिकृत फलकांविरोधात पिंपरी चिंचवड पालिकेनं कारवाईची सुरुवात केली आहे. शहरात अनधिकृत फलक सर्वेक्षणात आढळलेल्या 24 बेकायदेशीर फलकांविरोधात जाहिरात फलक धारक, जाहिरात धारक तसेच जागा मालक यांच्यावर कायदेशीर तरतुदींअंतर्गत पिंपरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जाहिरात फलकधारक आणि आयुक्त यांच्यातल्या बैठकीनंतर पालिकेनं 20 अनधिकृत फलक हटवले आहेत.

**<u>पुणे प्राध्यापक</u>**

पुण्यातली प्राध्यापक भरती 100 टक्के पूर्ण व्हावी या मागणीसाठी येत्या पाच जून पासून बेमुदत धरणं आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती पुणे पी.एचडी, नेट-सेट संघर्ष समितीकडून देण्यात आली आहे. याविषयी उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर यांनाही निवेदन देण्यात आलं आहे.

**<u>बुद्धिबळ</u>**

पुण्यात दिवंगत भरताबाई हलकुडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित, राष्ट्रीय खुल्या मानांकन बुद्धिबळ स्पर्धेत पश्चिम बंगालचा निलाश साहा विजेता ठरला. तर महाराष्ट्राचा पुष्कर ढेरे सहाव्या स्थानावर राहिला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज सकाळपासूनच ढगाळ वातावरण राहिले. आज कमाल तापमान 40 अंश तर किमान तापमान 25 पूर्णांक 7 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**